महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
CIN-U40109MH2005SGC1536
Email : edhrdist@gmail.com
edhr_dist@mahadiscom.in

कार्यकारी संचालक (मानव संसाधन)
यांचे कार्यालय
प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ०५१.
दूरध्वनि : २६४७५१२८ विस्तार: २५०८
Website : www.mahadiscom.in

क्र. का.सं. (मा.सं.)/ 32010

दिनांक : 24·8·2015

# परिपत्रक

**विषय : महावितरणच्या कामकाजाचा नियमित आढावा प्रसंगी तसेच कार्यालयांचा आढावा प्रसंगी उपस्थित ऊर्जा विभागाचे पदाधिकारी/अधिकारी यांचेबाबत राजशिष्टाचार व्यवस्था.**

मा. अध्यक्ष, एमएसईबी होल्डींग कंपनी तसेच महावितरणचे अन्य अधिकारी वेळोवेळी क्षेत्रीय बैठका आयोजित करीत असतात. अशा बैठकांच्या प्रसंगी स्वागतपर पुष्पगुच्छ तसेच शाल, श्रीफळ या बाबींसाठी अनावश्यक खर्च करणे अपेक्षित नाही. सबब यासंदर्भात काटकसरीच्या उपाययोजना म्हणून खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१) वरिष्ठ प्राधिकारी/अधिकारी यांचेमार्फत घेण्यात येणाऱ्या महावितरणच्या क्षेत्रीय कार्यालयाच्या भेटीप्रसंगी अथवा आढावा बैठकीसमयी कोणत्याही प्रकारे शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ इत्यादी स्वागताचे साहित्य वापरण्यात येऊ नये.

२) अशा बैठकीप्रसंगी किंवा कार्यक्रमाप्रसंगी सभा स्थान सुशोभित करणे अथवा आदरातिथ्याच्या अनुषंगाने कोणताही अतिरिक्त खर्च करू नये.

३) आढावा बैठक व क्षेत्रीय भेटी या साध्या पध्दतीने पार पाडाव्यात व त्यात कोणत्याही प्रकारचा अनावश्यक खर्च असू नये.

वरील सूचनांची तातडीने अंमलबजावणी करावी व या संदर्भात वरील सूचनांचे पालन न झाल्यास संबंधितांविरूध्द तातडीने शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

वरील परिपत्रक संचालक मा. व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (संचालन), संचालक (प्रकल्प) आणि संचालक (वित्त) यांच्याशी विचारविनिमय करून निर्गमित करण्यास अनुमती दिली आहे.

सदर परिपत्रक कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

24·8·15

(नीलेश गटणे)
कार्यकारी संचालक (मा.सं.)